**विषय :- केंद्र पुरस्कृत अमृत - २.० अभियनांतर्गत भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या १०० द.ल.लि. वाढीव पाणी पुरवठा प्रकल्पासाठी स्वहिस्सा निधी (मनपाचा हिस्सा) उभारणे बाबत.**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेची सद्याची पाणी पुरवठ्यातील तुट व भिवंडी शहारातील भविष्यातील पाण्याची गरज विचारात घेवुन भिवंडी निजामपूर शहर महनगरपालिकेस १०० द.ल.लि. वाढीव पाणी पुरवटा योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण तांत्रीक सल्लागार यांनी तयार केलेली आहे.

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेचा समावेश हा सद्या केंद्र पुरस्कृत अमृत - २.० अभियानंतर्गत करण्यात आलेला असून सदर योजनेचा आकृती बंध केद्रशासन हिस्सा ३३.३३ टक्के राज्य हिस्सा ३६.६७ टक्के व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचा हिस्सा ३० टक्के असा असून रुपये ४२६.०३ कोटी रक्कमेच्या प्रकल्पास मनपाचा हिस्सा रक्कम रुपये रु.१२७.८१ कोटी इतका असून सदरचा हिस्सा मनपा हिस्सा म्हणून उभारावा लागणार आहे व असा स्वहिस्सा निधी उभारणेचा ठराव प्रस्तावा सोबत सादर करावा लागणार आहे. करीता मान्यस्तेव सादर.

**प्रशासकीय ठराव क्र.:-** ५३ **दिनांक** १४ /११/**२०२२**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या १०० द.ल.लि./दिन वाढीव पाणी पुरवठा योजनेचा समावेश हा केंद्र पुरस्कृत अमृत -२.० अभिनांतर्गत झालेला आहे. सदर योजनेचे प्रकल्प तांत्रीक सल्लागार म्हणून म.जी.प्रा.यांनी भिवंडी महानगरपालिकेचा १०० द.ल.लि./दिन वाढीव पाणी पुरवठा योजनेचा रक्कम रुपये ४२६.०३ कोटी रक्कमेचा प्रकल्प अहवाल तयार केलेला आहे.

केंद्र पुरस्कृत अमृत २.० अभियानांतर्गत योजनासाठी वित्तीय आकृतीबंध केंद्र शासन हिस्सा ३३.३३ टक्के राज्य हिस्सा ३६.६७ टक्के व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचा हिस्सा ३० टक्के असा आहे. त्यानुसार प्रकल्प किंमतीच्या ३० टक्के हिशानुसार मनपाला रु.१२७.८१ कोटीचा मनपा हिस्सा उभारावा लागणार आहे तसी शासनास संमती द्यावी लागणार आहे.

त्याकरिता महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) नवि-१४ दि.६ जुन २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ब) मधील तरतुदीनुसार मात्र प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी विजय कुमार म्हसाळ, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका,भिवंडी केंद्र पुरस्कृत अमृत २.० अभियांनातर्गत रक्कम रुपये ४२६.०३ कोटीचा १०० द.ल.लि./दिन वाढीव पाणीपुरवठा योजनेसाठी वित्तीय आकृती बंध केंद्र शासन हिस्सा ३३.३३ टक्के राज्य हिस्सा ३६.६७ टक्के व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचा हिस्सा ३० टक्के याप्रमाणे रक्कम रुपये १२७.८१ कोटी मात्र इतका स्वहिस्सा निधी (मनपाचा हिस्सा) उभारणेस मंजुरी देत आहे.

**(विजयकुमार म्हसाळ)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी नि.शहर महानगरपालिका,भिवंडी.**

विषय :- भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या केंद्र पुरस्कृत अमृत २.० अभियानांतर्गत १०० द.ल.लि. वाढीव पाणी पुरवठा योजनेचा समावेश करणे ,प्रकल्पासाठी वित्तीय आकृतीबंधा नुसार स्वहिस्सा उभारणे व प्रकल्पाची अंमलबजावणी करणेस मान्यता मिळणे बाबत.

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेची सद्याची पाण्याची गरज ही १६२ एम.एल.डी.असून सद्या भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेस ११८ द.ल.लि. पाणी पुरवठा उपलब्ध असून सद्याचा पाणी पुरवठ्यात ४४ द.ल.लि. तुट आहे. सद्या भिवंडी शहराचा झपाट्याने विकास होत असून मोठ्या प्रमाणात नागरीकीकरण होत आहे. भिवंडी शहराची भविष्यातही मोठ्या प्रमाणात वाढ होणार आहे. त्यामुळे पाण्याची मोठ्या प्रमाणात गरज भासणार आहे. त्यामुळे शासनाने भिवंडी मनपास जलसंपदा विभागामार्फत १०० द.ल.लि. पाणी पुरवठा मंजुर केलेला आहे.

भिवंडी शहराची पाण्याची तुट व भविष्यातील पाण्याची गरज विचारात घेऊन शासनाने सन २०१७-१८ च्या आराखड्यात या शहराचा अमृत योजने अंतर्गत समावेश करुन भिवंडी शहाराची १०० द.ल.लि. वाढीव पाणी पुरवठा योजना अमृत योजने अंतर्गत मंजुर करण्यात आलेली होती.

सदर योजनेसाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने पिसे विअर येथे पंपीग स्टेशन, पिसे विअर पासून सोनाले पर्यंत पाईप लाईन टाकणे, जलशुध्दीकरण केंद्र, मुख्य संतुलन पाण्याची टाकी इत्यादी कामासाठी जागा देणेस तत्वत: मान्यता दिलेली आहे.

अमृत योजने अंतर्गत मंजुर असलेल्या १०० द.ल.लि./प्रतिदिन वाढीव पाणी पुरवठा योजनेच्या मनपा व शासन स्तरावर १० वेळा निविदा मागविण्यात आल्या परंतु एकाही निविदेस प्रतिसाद मिळाला नाही. दरम्यानच्या कालावधीत अमृत योजनेची मुदत संपल्याने शासनाने परिपत्रक क्र. अमृत-२०१७/ प्र.क्र.१२९/ नवि-३३ नगर विकास विभाग,मंत्रालय मुंबई-३२ दि. ५ फेब्रुवारी २०१८ अन्वये भिवंडी निजामपर शहर महानगरपालिकेची पाणी पुरवठा योजना सन २०१७-१८ च्या आराखड्यातुन रद्द करण्याचा शासनाने निर्णय घेतला.

सदर योजना अमृत अभियानातुन रद्द केल्यामुळे भिवंडी निजामपर शहर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठ्याची निकड विचारात घेऊन महानगरपालिकेने सदर प्रकल्पात आवश्यक सुधारणा करुन सुधारीत प्रकल्प अहवाल महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत आयुक्त तथा संचालक नगर परिषद संचानालय यांच्या मार्फत शासनास सादर करण्याच्या सुचना दिल्या. त्यानंतर सदर योजनेचे प्रकल्प तांत्रीक सल्लागार महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे मार्फत सदर पाणी पुरवठा योजनेचा सुधारीत प्रकल्प अहवाल संचालक तथा आयुक्त नगरपरिषद संचालनालय यांचेकडे महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजने अंतर्गत मंजुरीसाठी पाठवणेत आला. सदर प्रकल्प अहवालात काही तांत्रीक त्रुटी असल्याने पुन्हा नगरपरिषद संचालनालयाकडून सदरचा प्रकल्प अहवाल सुधारीत करणेकामी परत पाठवण्यात आला. त्याप्रमाणे पुन्हा प्रकल्प अहवालातील त्रुटी पुर्ण करणे करीता प्रकल्प तांत्रीक सल्लागार महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्याकडे पाठविणेत आला. त्या प्रकल्प अहावालातील त्रुटी पुर्ण करुन महाराष्ट् जीवन प्राधिकरणा कडून सदर प्रकल्प अहवाल सुधारीत करण्यात आला.

सदर पाणी पुरवठा योजनेचा प्रकल्प अहवाल तयार झाल्यानंतर केंद्र पुरस्कृत अमृत २.० अभियान सुरु झाले. शासनाने सर्व महानगरपालिका व नगरपरिषद यांचा समावेश केंद्र पुरस्कृत अमृत २.० अभियानांतर्गत केला तसेच अमृत पोर्टलवर योजना सादर करणेचे निर्देश झाले त्याप्रमाणे भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेची १०० द.ल.लि. वाढीव पाणीपुरवठा योजना केंद्र पुरस्कृत अमृत २.० अभियांनातंर्गत पोर्टलवर सादर करण्यात आली. सदर पाणी पुरवठा योजनेचा प्रकल्प अहवाल मान्यतेसाठी राज्यस्तरीय प्रकल्प अंमलबजावणी समितीकडे पाठविणे गरजेचे आहे. त्या करीता भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेचे प्रकल्प तांत्रीक सल्लागार यांनी सदर १०० द.ल.लि. वाढीव पाणीपुरवठा योजनेचा रु.४२६.०३ कोटी रक्कमेचा प्रकल्प अहवाल तयार करुन त्यास मुख्य अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे कडील तांत्रीक मंजुरी आदेश प्रपत्र नमुना क्र.४८ बाब ९३ माहे ऑक्टोबर २०२२ क्र. मजीप्रा./मु.अ.ठाणे/पा.पु.यो/तांशा/-२/२४०२ दि.४/१०/२०२२ अन्वये तांत्रीक मान्यता आहे. सदर योजनेचा केंद्र पुरस्कृत अमृत- २.० अंतर्गत समावेश करणे, प्रकल्पासाठी वित्तीय आकृतीबंधा नुसार स्वहिस्सा निधी उभारणे व प्रकल्प प्रस्ताव राज्यस्तरीय तांत्रिक समिती (SLTC) कडे सादर करुन त्यास मान्यता मिळाल्यानंतर सदर योजनेची अंमलबजावणी तातडीने करावी लागणार आहे.

**प्रशासकीय ठराव क्र.:-** ३४ **दि. ४/१०/२०२२**

सन २०२२-२३ च्या केंद्र पुरस्कृत अमृत २.० अभियानाच्या आराखाड्यात भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या १०० द.ल.लि. वाढीव पाणपुरवठा योजनेचा समावेश झालेला आहे. त्याकामी प्रकल्प तांत्रीक सल्लागार समावेश झालेला आहे. त्याकामी प्रकल्प तांत्रीक सल्लागार महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे मार्फत तयार करणेत आलेला रु. ४२६.०३ कोटीच्या १०० द.ल.लि. वाढीव पाणी पुरवठा योजनेचा प्रस्ताव राज्यस्तरीय तांत्रिक (SLTC) समिती (SLTC) कडे मान्यतेसाठी पाठविण्यास व राज्यस्तरीय तांत्रिक समितीची मान्यता प्राप्त झाल्यानंतर सदर योजनेची तातडीने अंमलबजावणी करणे करीता महाराष्ट्र शासन, नगर विकास विभागाकडील शासन निर्णय क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२) नवि-१४ दि. ६ जुन २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ब) मधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या आधिकारानुसार मी विजयकुमार म्हसाळ, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी. सदर योजनेचा केंद्र पुरस्कृत अमृत- २.० अंतर्गत समावेश करणे, प्रकल्पासाठी वित्तीय आकृतीबंधा नुसार स्वहिस्सा निधी उभारणे, प्रकल्प अंमलबजावणी करणे व प्रस्ताव राज्यस्तरीय तांत्रिक समिती (SLTC) कडे सादर करणेकामी मंजुरी देत आहे.

**(विजयकुमार म्हसाळ)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी नि.शहर महानगरपालिका,भिवंडी.**

**विषय :- केंद्र पुरस्कृत अमृत - २.० अभियनांतर्गत भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या १०० द.ल.लि. वाढीव पाणी पुरवठा प्रकल्पासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) नेमणेकामी मान्यता मिळणे बाबत.**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेचा केंद्र पुरस्कृत अमृत २.० अभिनांतर्गत समावेस झालेला असून १०० द.ल.लि. वाढीव पाणीपुरवठा योजना अमृत पोर्टलवर सादर करण्यात आली असता सदर योजनेस केंद्र पुरस्कृत अमृत २.० अभियानांतर्गत मान्यता मिळाली आहे.

सदर योजनेचा रक्कम रुपये ४२६.०३ कोटी रक्कमेचा प्रकल्प अहवाल महाराष्ट्र जीवन प्राधिकरणा मार्फत तयार करुन त्यास तांत्रीक मंजुरी आदेश प्रपत्र नमुना क्र. ४८ बाब क्र. ९३ माहे ऑक्टोबर पत्र क्रमांक मजिप्रा/मु.अ.ठाणे/पा.पु.यो./तांशा-२/२४०२ दि.४/१०/२०२२ नुसार तांत्रीक मान्यता घेण्यात आलेली आहे. सदर प्रकल्प राज्यस्तरीय तांत्रीक समिती (SCTC)कडे पाठविण्यात येत आहे. सदर प्रकल्प मंजुर होताच भिवंडी महानगरपालिकेच्या मार्फत योजनेच्या निविदा प्रपत्र तयार करणे, निविदा अंतिम करणे, निविदा मागविणे, प्रीबीड मिटींग बोलवणे, निविदा अंतीम करणे, कार्यादेश व करारनामा तयार करणे, नियुक्त ठेकेदाराचे कामावर प्रत्येक्ष नियंत्रण व सुपरव्हीजन करणे, नियुक्त केलेल्या ठेकेदारांने वेळोवेळी सादर केलेले आराखडे, केलेल्या कामाची गुणवत्ता प्रमाणपत्रे तपासुन देयके सादर करणे, तसेच प्रकल्प पुर्ण होई पर्यंत कामाच्या वेगवेगळ्या टप्यावर काम करणे इत्यादी कामासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची आवश्यता आहे.

महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन परिपत्र क्र. अमृत -२०२२/प्र.क्र.२०३ /नवि -३३ मंत्रालय मुंबई- ३२ दि.१६ सप्टेंबर २०२२ मधील बाब क्र. ३ मध्ये नमुद केल्याप्रमाणे अमृत -२.० अभियांनातर्गत मंजुर झालेल्या प्रकल्पासाठी नागरी स्वराज्य संस्थाना ३ पर्यायी पैकी १ पर्याय निवडण्याची मुभा देण्यात आलेली आहे. त्यापैकी सदर परिपत्रकातील बाब क्र.३ (अ) नुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची भिवंडी मनपाचे १०० द.ल.लि वाढीव पाणी पुरवठा योजनेसाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नेमणूक करणे उचित राहील करिता मान्यतेस्तव सादर.

प्रशासकीय ठराव क्रमांक. :- ३६ दिनांक ४ /१०/२०२२

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या १०० द.ल.लि. वाढीव पाणी पुरवठ्याचा केद्र पुरस्कृत अमत-२.० अभियांनातर्गत समावेश झाला असून सदर योजना मान्यतेसाठी शासनाकडे पाठविण्यात येत आहे. सदर योजनेस थोड्याच कालावधीत प्रशासकीय मान्यता अपेक्षित आहे. सदर योजनेची प्रशासकीय मान्यता मिळताच निविदा मागवुन प्रकल्पाच्या कामकाजाला सुरुवात होणार आहे. शासन परिपत्र क्र. अमृत-२०२२/प्र.क्र.२०३ /नवि -३३ मंत्रालय मुंबई -३२ दि.१६ सप्टेंबर २०२२ मधील बाब क्र. ३ मध्ये नमुद केल्याप्रमाणे अमृत -२.० अभियांनातर्गत मंजुर झालेल्या प्रकल्पासाठी नागरी स्वराज्य संस्थाना ३ पर्यायी पैकी १ पर्याय निवडण्याची मुभा देण्यात आलेली आहे. त्यापैकी सदर परिपत्रकातील बाब क्र.३ (अ) नुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची भिवंडी मनपाचे १०० द.ल.लि. वाढीव पाणी पुरवठा योजनेसाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) नवि-१४ दि.६ जुन २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका

अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ब) मधील तरतुदीनुसार मात्र प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी विजयकुमार म्हसाळ, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका,भिवंडी केंद्र पुरस्कृत अमृत २.० अभियांनातर्गत रक्कम रुपये ४२६.०३ कोटीच्या १०० द.ल.लि. वाढीव पाणी पुरवठा योजनेसाठी प्रकल्पा व्यवस्थापन सल्लागार म्हणून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची नेमणूक करणेकामी मजुरी देत आहे. या कामाबाबतचा करारनामा सुध्दा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**(विजयकुमार म्हसाळ)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी नि.शहर महानगरपालिका,भिवंडी.**